# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नासिक
## अंतर्गत संज्ञापन पत्र

**प्रेषक:**प्रा.विजयकुमार पाईकराव

**विषय :** मौलाना आझाद यांचे शिक्षण विचार आणि भारतीय शिक्षण दूरदृश्य व्याख्यान इतिवृत्त अहवाल ....


**प्रति:** मा. कुलगुरू

**दिनांक:** २२/११/२०२४

उद्दिष्टे: माहितीसाठी/ विचारार्थ/मंजुरीसाठी/सूचना/निर्णयार्थ/कृतीसाठी/अवलोकनार्थ फिरविणे

**मौलाना आझाद यांचे शिक्षण विचार आणि भारतीय शिक्षण दूरदृश्य व्याख्यान इतिवृत्त मान्यतेसाठी सविनय सादर..**

आपल्या विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या **वतीने राष्ट्रीय शिक्षण दिन आणि बाल दिनानिमित्त मौलाना आझाद यांचे शिक्षण विचार आणि भारतीय शिक्षण** या विषयावर व्याख्याते मा. श्री. संदीप वाकचौरे , शिक्षणतज्ञ संगमनेर,जि. अहिल्यानगर यांचे व्याख्यान गुरुवार दिनांक १४ नोव्हेंबर २०२४, भारतीय सौर २३ कार्तिक शके १९४६ रोजी सकाळी १२.०० ते दुपारी १.०० वाजता दूरदृश्य प्रणाली द्वारे झूम वर आयोजित केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा.प्रा. संजीव सोनवणे ,कुलगुरू भूषविले. याची कार्यक्रम पत्रिका व झूम लिंक .





Director Education YCMOU is inviting you to a scheduled Zoom meeting.

Topic : **मौलाना आझादांचा शिक्षण विचार आणि भारतीय शिक्षण**

Time: Nov 14, 2024 12:00 PM India
Join Zoom Meeting
https://us06web.zoom.us/j/87474031379? pwd=y4EsL5VIRcLc1pm09CBkAQyfTJkbM6.1
Meeting ID: 874 7403 1379
Passcode: ycmou

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/6406
दि. 23/ 11 /२०24.

**कार्यक्रम पत्रिका**


यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
— शिक्षणशास्त्र विद्याशाखा —
शिक्षण दिन व बालदिनानिमित्त व्याख्यान
दि. १६.११.२०२४ दु. ३.२० वा.

विषय : मौलाना आझाद आणि भारतीय शिक्षण
महनिय वक्ते : मा. संदीप वाकचौरे, शिक्षणतज्ज्ञ
अध्यक्ष : मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरु

१. स्वागत : परिचय, कार्यक्रमाची रूपरेषा. २ मि.
प्रा. विजयकुमार पाईकराव
२. प्रास्ताविक : प्रा. डॉ. संजीवनी महाले. ३ मि.
३. महनिय व्याख्यात्यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान
मा. श्री. संदीप वाकचौरे : ४५ मि.
४. अध्यक्षीय समारोप : मा. प्रा. संजीव सोनवणे
कुलगुरु. ५ मि.
५. आभार : प्रा. विजयकुमार पाईकराव. १ मि.


या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका प्रा.डॉ.संजीवनी महाले यांनी केले. महनीय व्याख्याते श्री. संदीप वाकचौरे यांनी मौलाना आझाद व भारतीय शिक्षण या विषयी पुढील प्रमाणे व्याखानात प्रतिपादन केले. भविष्यात भारताचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे व स्वतंत्र भारतात लोकशाही रुजली पाहिजे, बळकट झाली पाहिजे या हेतूने भारताचे तत्कालीन प्रथम शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी स्वतंत्र भारतातील शिक्षणपद्धतीची सुरुवात केली, असे प्रतिपादन शिक्षणतज्ञ श्री. संदीप वाकचौरे यांनी केले.




यावेळी पुढे बोलतांना श्री. वाकचौरे पुढे म्हणाले की मौलाना अबुल कलाम आझाद हे शिक्षणाचे महत्व जाणणारे द्रष्टे विचारवंत व उदारमतवादी शिक्षणतज्ञ होते. भारतासारख्या विविधतापूर्ण देशात केवळ शिक्षणाने समृद्ध व एकीकृत समाज निर्माण होवू शकतो याची त्यांना जाण होती. शिक्षण हा प्रत्येकाचा मुलभूत अधिकार आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतिपादीत केले होते. त्यास मौलाना अबुल कलाम आझाद यांचा पूर्ण पाठिंबा होता. केवळ साक्षर व्यक्तींनाच मतदानाचा अधिकार असावा अशी मागणी जेव्हा होत होती तेव्हा त्यांनी प्रौढ साक्षरतेची मागणी करतांना लोकशाहीत प्रत्येकालाच मतदानाचा अधिकार असायला हवा अशी भूमिका घेतली. स्वतंत्र भारतात दारिद्याचे प्रमाण लक्षणीय होते. अशा परिस्थितीत केवळ शिक्षण व मेहनतीने आर्थिक सुबत्ता येवू शकते असे मत त्यांनी मांडले होते. गुणवत्तापूर्ण शिक्षणातून एक जबाबदार नागरिक घडत असतो. त्यामुळे शिक्षणात आधुनिक शिक्षण, तत्वज्ञान व साहित्य यांचा

देखील समावेश असायला हवा अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. त्यांच्यावर १९ व्या शतकातील भारतातील ज्येष्ठ शिक्षणतज्ञ व समाजसुधारक सर सय्यद अहमद खान यांचा मोठा प्रभाव होता. त्यामुळे सर्व धर्मातील स्त्रियांना देखील पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण मिळाले पाहिजे असे त्यांचे आग्रही प्रतिपादन असायचे. सर्वांना सक्तीचे व मोफत शिक्षण मिळाले पाहिजे याचा त्यांनी वारंवार पुनरुच्चार केलेला होता.


शिक्षणसंस्थांना आधुनिक साधने पुरविली पाहिजेत, विद्यार्थ्यांना तांत्रिक व वैज्ञानिक शिक्षण दिले पाहिजे, भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे कृषीचे शिक्षणही तितक्याच क्षमतेने दिले गेले पाहिजे असा त्यांचा आग्रह असायचा. भारतातील गोरगरीब हे कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी दिवसभर काबाडकष्ट करतात. त्यामुळे त्यांच्यासाठी रात्रशाळा सुरु करण्यात यावी हा विचार देखील मौलाना अबुल कलाम आझाद यांनी मांडला असल्याचे व्याख्याते श्री. वाकचौरे यांनी सांगितले. सध्याच्या काळात उच्चशिक्षित जनता मतदानाविषयी व एकूणच लोकशाही प्रणाली विषयी उदासीन दिसून येत आहे. आजही देशातील लाखो मुले प्राथमिक व




माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहत आहेत. शिक्षण हे समृद्ध समाज निर्मिती ऐवजी केवळ पदवी मिळविण्याचे साधन मानले जात आहे, नागरिकांच्या आर्थिक उत्पन्नानुसार शाळांचेही गट तयार झालेले आहेत, परिणामी सामाजात आर्थिक व सामाजिक विषमता या वेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की स्वतंत्र भारताचे प्रथम शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान व दिशादर्शन उल्लेखनीय व महत्वपूर्ण होते. त्यातूंच पुढे भारतात आयआयटी, एनसीईआरटी, युजीसी, विविध विद्यापीठे या सारख्या उच्च शिक्षणसंस्था व शिक्षण केंद्रे तयार झाली. भारतीय समाज हा त्यांच्या शिक्षण धोरणाच्या केंद्रास्थानी होता. आताच्या नवीन शैक्षणिक धोरणामुळे परीक्षेचे अवास्तव महत्व कमी होईल, प्रत्येक अध्ययन झालेल्या मर्यादेच्या भिंती नाहीशा होवून ज्ञानाधिष्ठीत भारतीय समाज व पिढी तयार होवून देश प्रगतीपथावर जाईल असा विश्वास देखील मा. कुलगुरू प्रा. सोनवणे यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी व्यक्त केला. विषयांमध्ये निर्माण यावेळी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंदाचे प्रमुख डॉ. दयाराम पवार उपस्थित होते. प्रास्ताविक विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालिका तथा व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले यांनी केले. या दुरदृश्य प्रणाली व्याख्यान सत्राचे संयोजन, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. सदर दूरदृश्य प्रणाली आयोजित व्याख्यानात विद्यापीठातील विविध विद्याशाखा संचालक, विभागीय केंद्रसंचालक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , शैक्षणिक संयोजक, अध्ययनार्थी इ.७५ श्रोते सहभागी झाले होते. या कार्याक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री.राजेश बर्वे , नंदू थेटे ,सचिन तरवटे, प्रतिक कोथमिरे व राहुल पगारे यांनी परिश्रम घेतले .




- **उपस्थित श्रोत्यांचे  प्रकाश चित्र .**




- **व्याखानाची वृत्तपत्रातील प्रसिद्धी**



YCMOU PRO BHR P3 211124 ३

# भारतीय शिक्षण विषयावर मुक्त विद्यापीठात व्याख्यान

नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- भविष्यात भारताचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे व स्वतंत्र भारतात लोकशाही रुजली पाहिजे, बळकट झाली पाहिजे, या हेतूने भारताचे तत्कालीन प्रथम शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी स्वतंत्र भारतातील शिक्षणपद्धतीची सुरुवात केली, असे प्रतिपादन अहिल्यानगर येथील प्राध्यापक व शिक्षणतज्ज्ञ संदीप वाक्चौरे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखे तर्फे शिक्षणदिन व बालदिनानिमित्त 'मौलाना आझाद यांचा शिक्षण विचार आणि भारतीय शिक्षण' याविषयी दूरदृश्य प्रणाली (ऑनलाईन) पद्धतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते.

यावेळी बोलताना प्रा. वाक्चौरे पुढे म्हणाले, की मौलाना अबुल कलाम आझाद हे शिक्षणाचे महत्व जाणणारे द्रष्टे विचारवंत व उदारमतवादी शिक्षणतज्ज्ञ होते. भारतासारख्या विविधतापूर्ण देशात केवळ शिक्षणाने समृद्ध व एकीकृत समाज निर्माण होऊ शकतो, याची त्यांना जाण होती. शिक्षण हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे, असे भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतिपादित केले होते. त्यास मौलाना अबुल कलाम आझाद यांचा पूर्ण पाठिंबा होता.

आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले, की स्वतंत्र भारताचे प्रथम शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान व दिशादर्शन उल्लेखनीय व महत्त्वपूर्ण होते. त्यातूच पुढे भारतात आयआयटी, एनसीईआरटी, यूजीसी, विविध विद्यापीठे यांसारखी उच्च शिक्षण संस्था व शिक्षण केंद्रे तयार झाली.

यावेळी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्राचे प्रमुख डॉ. दयाराम पवार उपस्थित होते. प्रास्ताविक विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालिका तथा व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले यांनी केले. या दूरदृश्य प्रणाली व्याख्यान सत्राचे संयोजन, सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले.



DESHDOOT Times

....watching north maharashtra

YCMOU PRO DTM SP4 171124

epaper.deshdoot.com
17 Nov 2024 - Page 4

# Lecture on Maulana Azad's educational ideals held

NASHIK: Maulana Abul Kalam Azad, India's first Education Minister, envisioned an education system for independent India that would secure the nation's freedom and strengthen its democratic foundation, emphasized Prof. Sandeep Wakchoure, an educationist from Ahilyanagar. He was addressing an online lecture organized by the education faculty of Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU) on the topic 'Maulana Azad's Educational Thoughts and Indian Education' to mark Education Day and Children's Day. The programme was presided over by the university's Vice-Chancellor, Prof. Sanjeev Sonawane.

Prof. Wakchoure highlighted Azad's vision of modernizing educational institutions with technical and scientific advancements while integrating agricultural education, reflecting India's agrarian roots. He noted that Azad championed the concept of night schools to accommodate working-class individuals who toiled throughout the day to support their families.

He expressed concern over current educational trends, where education is often pursued merely for degrees rather than societal development. He criticized the indifference of the educated populace toward voting and democratic processes. Wakchoure also lamented the persistence of educational disparities, with millions of children still deprived of basic schooling. He pointed out the emergence of school systems segregated by economic class, exacerbating social and economic inequalities.

On this occasion, Dr. Dayaram Pawar, head of the University's student welfare and external centre, was present. Dr. Sanjeevani Mahale, director of education faculty management board member of the University made the introductory speech. This online lecture session was coordinated, compered by Prof. Vijaykumar Paikrao. He also proposed a vote of thanks.

- **कार्यक्रमाची मान्यता प्रत व परिपत्रक**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade

अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

जा.क्र.... दिनांक.... आ.क्र.... दिनांक....
जा.क्र.... दिनांक.... आ.क्र.... दिनांक....
कुलसचिव कार्या. जा.क्र.... दिनांक....
कुलसचिव कार्या. आ.क्र.... दिनांक....
कुलगुरु कार्यालय जा.क्र.... दिनांक....
कुलगुरु कार्यालय आ.क्र.... दिनांक....
जा.क्र.... दिनांक.... आ.क्र.... दिनांक....

**प्रेषक :** प्रा. विजयकुमार पाईकराव,

**विषय:** राष्ट्रीय शिक्षण व बाल दिनानिमित्त व्याख्यानबाबत.

**धारिका :** यचमम्/शिशा/२०२४

**प्रति :** मा. कुलगुरू

**दिनांक :** १३/११/२०२४

राष्ट्रीय शिक्षण दिन आणि बालदिनानिमित्त शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे दिनांक १४/११/२०२४ रोजी ऑनलाईन पद्धतीने **मा. श्री संदीप वाकचौरे, शिक्षणतज्ज्ञ अहिल्यानगर** यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे. त्या व्याख्यानासाठी येणारा अंदाजे खर्च पुढीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| तज्ज्ञ मानधन | = | रु. ३,०००/- |
| किरकोळ खर्च | = | रु. १,०००/- |
| **एकूण खर्च** | = | रु. ४,०००/- |

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**

सदर व्याख्यानासाठी येणारा खर्च रु. ४,०००/- (चार हजार फक्त) हा शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या TA/DA Expenses for Expert and Others (2042) या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यास मान्यता द्यावी ही विनंती आदर व आभारासह.

प्रा. विजयकुमार पाईकराव
समन्वयक

**मार्फत,**
मा. प्रा. संजीवनी महाले
प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

**मा. वित्त अधिकारी**

**मा. कुलसचिव**

**मान्य / अमान्य**

मान्य

**मा. कुलगुरू**

14/11/24

य. च. म. मुक्त विद्यापीठ, वित्त विभाग, अंतर्गत आवक क्र.: 882, दिनांक : 13-11-24

कुलसचिव कार्यालय, आवक क्र. 3575, दिनांक : 13/11/2024

मा. कुलगुरु कार्यालय, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक, अंतर्गत आवक क्र.: VC/6358, दि. 14/11/2024

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२ २२२

जावक क्र. : यचममुवि/शिक्षणशास्त्र/२०२४/ दिनांक : १३.११.२०२४

आपल्या विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या वतीने राष्ट्रीय शिक्षण दिन आणि बाल दिनानिमित्ताने दूरदृश्य झूम व्याख्यान आयोजित केले आहे. त्यास उपस्थित राहावे.

मा.कुलगुरू कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील .

**विषय :** **मौलाना आझाद यांचा शिक्षण विचार आणि भारतीय शिक्षण**
**व्याख्याते :** **मा. संदीप वाकचौरे, शिक्षणतज्ज्ञ**
**दिनांक :** **गुरुवार १४ नोव्हेंबर २०२४ वेळ : सकाळी ११:३० ते दु. १:०० वाजता**
**Meeting ID: 874 7403 1379**
**Passcode: ycmou**

तरी विद्यापीठातील सर्व शिक्षकवृंद, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, शैक्षणिक संयोजक व कंत्राटी कर्मचारी तसेच विद्यार्थी यांनी व्याख्यानास उपस्थित राहावे.

(दिलीप भरड)
कुलसचिव

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक-४२२ २२२

प्रत माहितीस्तव- मा. कुलगुरू कार्यालय
मा. प्र-कुलगुरू कार्यालय

प्रत : सर्व विद्याशाखा संचालक, विभाग, केंद्र, कक्ष प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व सहकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

प्रा. विजयकुमार पाईकराव
व्याख्यान सत्र समन्वयक

मार्फत:-
प्रा. डॉ. संजीवनी महाले
संचालिका, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

**मा. कुलगुरू**

23/11/24